# विद्यापीठाची स्वायत्तता

गोवा विधानसभेच्या गेल्या पावसाळी अधिवेशनप्रसंगी गोवा विद्यापीठाच्या कारभाराची चर्चा विधानसभेत करण्यात माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या सरकारची असमर्थता प्रकट केली. त्यांच्या मतानुसार ही चर्चा विद्यापीठाच्या स्वायत्ततेचा भंग करील. या लेखात लोकप्रतिनिधींना आणि समाजाला विद्यापीठ स्वायत्ततेचा खराखुरा परिचय करून देण्याचा प्रयत्न आहे.

विद्यापीठ स्वायत्तता म्हणजे कुठल्याही बाह्य हस्तक्षेपाशिवाय आपला कारभार करण्याचे विद्यापीठाचे स्वातंत्र्य. विद्यापीठाला स्वायत्ततेची का आवश्यकता आहे? विद्यापीठ आम्हाला अंधारातून प्रकाशाकडे नेते. अज्ञानाच्या आणि पूर्वग्रहांच्या शृंखलातून मुक्त करते. ह्यासाठीच विद्यापीठाच्या स्वायत्ततेची जरूरी आहे. सुसंस्कृत विचारसरणी, नितांत रमणीय अभिरुची तसेच निर्मल आणि पवित्र बुध्दिमत्ता हे उच्च संस्कृतीचे गुणविशेष आहेत. विद्यापीठ हे संस्कृतीचे संवर्धन केंद्र आहे. म्हणून पाकळ्यांच्या कोशात जसे फूल दडलेले असते तसे राष्ट्राचे भवितव्य विद्यापीठात दडलेले असते.

### वस्तुस्थिती

आमच्या विद्यापीठांचा इतिहास आम्हाला दाखवितो की भारतात राज्यकर्ते, धनवान, सत्ताधीश आणि विद्यापीठाचे प्रशासक हे विद्यापीठ स्वायत्ततेचे खरे शत्रु आहेत. या छुप्या आणि प्रबळ शत्रूंमुळे विद्यापीठ स्वायत्तता ही भारतात फक्त नाममात्र बाब झाली आहे. स्वायत्ततेच्या नावाखाली विद्यापीठातून हुकूमशहांचा लहरी आणि निरंकुश कारभार चालतो. आमची जुनी आणि नवी गौरवशाली परंपरा असलेली आणि नसलेली सारीच विद्यापीठे भ्रष्टाचाराने ग्रासलेली आहेत. हा विद्यापीठांतील भ्रष्टाचार पुढील बाबतीत ठळकपणे जाणवतो. प्राध्यापकांच्या नेमणुका करणे व बढत्या देणे, इमारती बांधणे व त्यांची निगा राखणे, फर्निचरची खरेदी, ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोग शाळांतील उपकरणे यांची खरेदी आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा.

शिक्षक हा प्रत्येक विद्यापीठाचा कणा आहे. जेव्हा शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी जाहिरात दिली जाते तेव्हा उमेदवारांना त्यांच्यात आवश्यक गुण असले तरच अर्ज पाठविण्याची सूचना दिलेली असते. प्रामाणिक उमेदवार आवश्यक गुण त्यांच्यात नसल्यास अर्ज पाठवीत नाहीत. ज्या उमेदवारात आवश्यक गुण आणि पात्रता असते त्यांची निवड केली जात नाही. ज्या उमेदवारात आवश्यक गुण व पात्रता नाही, पण जे विद्यापीठ प्रशासकांच्या खास मर्जीतले असतात त्यांना अर्ज भरावयास सांगण्यात येते. त्यांना मुलाखतीसाठी बोलाविले जाते आणि विद्यापीठाचे प्रशासक त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करून अयोग्य उमेदवारांची प्राध्यापक म्हणून नेमणूक करतात.

विद्यापीठीय प्राध्यापकांच्या बहुसंख्य नेमणुकांचा अंतिम निर्णय भोजनाच्या टेबलावर घेतले जातात आणि निवड समितीद्वारे त्यांना औपचारिक मान्यता दिली जाते. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अधिकृत सूचनांची आणि पात्र उमेदवारांना मुलाखतीस यावे म्हणून विद्यापीठांनी घातलेल्या विशिष्ट अटींची विद्यापीठाच्या प्रशासकांकडून जाणून बुजून पायमल्ली होते. आपल्या खास मर्जीतल्या प्राध्यापकांचा पगार ठरवताना पाच पगारवाढी दिल्या जातात. पण पात्र उमेदवाराला मात्र एकही पगारवाढ दिली जात नाही.

### प्रोफेसर

'प्रोफेसर'ही विद्यापीठाच्या प्राध्यापकांच्या श्रेणीत एकदम वरची श्रेणी आहे. पण विशिष्ट गुणवत्ता, विशाल बुध्दिमत्ता व शिकविण्याचा प्रदीर्घ अनुभव पाठीशी नसताना कुणाचीही प्रोफेसर म्हणून नेमणूक केली जाते. कारण विद्यापीठाच्या प्रशासकांच्या खास मर्जीतील ही माणसे असतात. योग्य गुणवत्ता आणि प्रदीर्घ अनुभव असलेल्या शिक्षकांना खालच्या जागेवर दीर्घकाळपर्यंत काम करावे लागते. विद्यापीठ अनुदान मंडळ विद्यापीठातील ही कोंडी नाहीशी करण्यासाठी वरच्या जागांना मान्यता देण्यास उत्सुक आहे. ते विद्यापीठांना त्यांच्या आवश्यक योजना कळविण्यास प्रोत्साहन देते. पण जे प्राध्यापक विद्यापीठांच्या प्रशासकांचे खुषमस्करे होऊ इच्छित नाहीत आणि ज्यांना 'गॉडफादर्स' नाहीत ते खालच्या श्रेणीतच निवृत्त होतात. ही विद्यापीठांतील ज्ञानदानाची शोकांतिका आहे.

विद्यापीठाचे प्रशासक त्यांच्या योग्यायोग्यतेच्या निर्णयाच्या अधिकारांचा (Discretionary powers) वापर अत्यंत हास्यास्पद रीतीने करतात. जे प्रशासकांच्या मर्जीतल्या नसलेल्या प्राध्यापकांच्या बाबतीत निकृष्ट प्रतीचे गणले जाते तेच मर्जीतल्या प्राध्यापकांच्या बाबतीत उत्कृष्ट प्रतीचे ठरविले जाते. कुठलीही गुणवत्ता नसलेले प्राध्यापक त्यांच्या अचुक लागेबांध्यामुळे शिक्षणक्षेत्रात

**मारुती अवदी**

थोड्याच अवधीत फार मोठ्या जागा बळकावतात. अशा निकृष्ट प्रतीच्या प्राध्यापकांना आणि त्यांच्या नेमणुका करणाऱ्या उपकुलगुरु आणि कुलसचिव यांना विद्यापीठात कोण मान देणार? आणि असले विद्यापीठाचे प्रशासक गुणवत्तेला कसे उत्तेजन देऊ शकणार? विद्यापीठाच्या प्रशासकांची ही हातचलाखी आणि त्यांची नैतिक अधोगती समाजासमोर येऊ शकत नाही कारण ते विद्यापीठाच्या स्वायत्ततेच्या ढालीखाली लपतात.

### भ्रष्टाचाराच्या संधी

वास्तुशास्त्रज्ञ, बांधकाम करणारे व माल पुरविणारे कंत्राटदार आणि विद्यापीठाचे प्रशासक यांच्यामधील लिखित करारांच्या मागे महत्वाचे अलिखित संकेत असतात. आज भारतात विद्यापीठाच्या विकासाच्या सबबीखाली विद्यापीठाच्या प्रशासकांना संपत्ती मिळविण्याचे अगणित मार्ग उपलब्ध आहेत. देशात आणि देशाबाहेर कोणत्यातरी सबबीखाली पुन्हा पुन्हा विमानाने प्रवास करणे, खर्चिक हॉटेलमध्ये आरामशीरपणे राहणे हे प्रकार तर सर्रास चालतात.

विद्यापीठाचे कार्यकारी मंडळ ही विद्यापीठ प्रशासकांच्या निर्णयांना मान्यता देणारी महत्वाची यंत्रणा आहे. दुर्दैवाने कार्यकारी मंडळ सर्व पैलू जाणून या निर्णयांच्या युक्ता युक्ततेची शहानिशा करत नाही. ते विद्यापीठाच्या प्रशासकांनी तयार केलेल्या सारांशाच्या आधारेच मान्यता देते. प्रत्येक सारांशाचा शेवट खालील सूचक वाक्याने झालेला असतो, 'कार्यकारी मंडळाने कृपया मान्यता द्यावी.' अशा प्रकारे कार्यकारी मंडळ हा विद्यापीठ प्रशासकांचा 'रबरस्टँप' झालेला आहे.

विद्यापीठाच्या कारभारात बाहेरील संस्थांचा हस्तक्षेप न होणे हा विद्यापीठ स्वायत्ततेचा खरा अर्थ नव्हे. हा हेतूपुरस्सर पसरवलेला गैरसमज आहे. विद्यापीठ स्वायत्तता म्हणजे केवळ उपकुलगुरु, कुलसचिव आणि हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखे नेमलेले आणि निवडून आलेले सदस्य यांचे साम्राज्य नव्हे. विद्यापीठ स्वायत्ततेचा खरा अर्थ असा आहे की विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व बाबींच्या प्रक्रियेमध्ये सर्व कॉलेजमधील व विद्यापीठातील शिक्षकांची कृतिशील समरसता. जेव्हा विद्यापीठाच्या स्वायत्ततेच्या कृतिशील समरसता. जेव्हा विद्यापीठाच्या स्वायत्ततेच्या जोडीला विद्यापीठात अंतर्गत स्वायत्तता नसते तेव्हा विद्यापीठ आगीतून फुफाट्यात पडते याची समाजाने दखल घेतली पाहिजे.

विद्यापीठाला खरीखुरी स्वायत्तता कशी मिळेल? नागरिकांच्या स्वातंत्र्याप्रमाणे विद्यापीठाशी स्वायत्तता कधीही अबाधित नसते आणि असूही शकत नाही. विद्यापीठ स्वायत्ततेवर स्पष्ट मर्यादा आहेत. विद्यापीठांना संपूर्णतः आर्थिक साहय शासन देते. विद्यापीठांच्या अंदाजपत्रकापायी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात. हा सार्वजनिक पैसा योग्य रीतीने खर्च होतो किंवा नाही हे पाहणे हे सामाजिक जाणिव असलेल्या नागरिकांचे पवित्र कर्तव्य आहे. विद्यापीठांत गुणांची कदर केली जाते का? विद्यापीठाचे उपकुलगुरु आणि कुलसचिव वशिल्याच्या तट्टांची प्राध्यापक म्हणून नेमणुका तर करीत नाहीत ना हेही नागरिकांनी काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. म्हणून विद्यापीठाच्या कारभाराविषयी सदैव खुली चर्चा व्हायला पाहिजे. त्यांच्या कारभाराची चिकित्सा व्हायला पाहिजे. शासनाप्रमाणेच लोकांना त्यांच्या लायकी व पात्रतेनुसारच विद्यापीठ लाभते.

### हिशेब

माननीय मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाच्या बाबतीत सरकारने कांही हालचाल करायला हवी असेल तर आमदारांनी गोवा विद्यापीठ कायद्यात बदल करावा असे सुचविले आहे. त्यांच्या मताचा योग्य तो आदर राखून असे म्हणावेसे वाटते की अशा प्रकारच्या प्रवृत्तीमुळे औपचारिक कायद्यांना फाजील महत्व दिले जाते. प्रचलित गोवा विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाने आपले वार्षिक हिशेबाचे अहवाल 'ऑडिट रिपोर्ट'सह गोवा सरकारला विधानसभेच्या अधिवेशनापूर्वी सादर करायला पाहिजेत. १९८८ च्या 'गोवा पब्लिक मॅन्स' भ्रष्टाचारविषयक मंडळाच्या 'सार्वजनिक व्यक्ती'च्या व्याख्येमध्ये कार्यकारी मंडळाच्या सदस्यांचा समावेश केला आहे. यामुळे गोवा सरकार आणि गोव्याची विधानसभा विद्यापीठाच्या प्रत्येक घटकाची छाननी करण्यास बांधले गेलेले आहे.

निःसंशयपणे गोवा विद्यापीठ कायद्यात महत्वाचे बदल करण्याची आवश्यकता आहे. त्या कायद्याची ठळक वैगुण्ये म्हणजे विद्यापीठाच्या वेगवेगळ्या घटकांच्या संयोजनाची आणि त्यांच्या सदस्यांची निवड करण्याची सदोष पध्दती आणि त्यांच्या अधिकारांची झालेली विभागणी. विद्यापीठाचे नियम - अधिनियमावलीही सदोष आहे. शिक्षक हा विद्यापीठाचा अविभाज्य आणि अत्यंत महत्वाचा घटक आहे. सद्यः कालीन नियमानुसार त्याला गोवा विद्यापीठाच्या कारभारात कुठेही स्थान नाही. विद्यापीठ मसुदा करणाऱ्यांनी एका बाबीकडे लक्ष दिलेले दिसत नाही. सर्व विद्यापीठांत कुलसचिव हा केवळ विद्यापीठ प्रशासनाचा प्रमुख व दप्तर सांभाळणारा असतो.

सद्यःकालीन कायद्यानुसार आणि नियम अधिनियमांनुसार गोवा विद्यापीठाला ज्ञानक्षेत्रात प्रतिष्ठा आणि गुणवत्ता प्राप्त होण्याची शक्यता दिसत नाही. या करिता लोक प्रतिनिधींनी आणि समाजाने गोवा विद्यापीठात खऱ्या अर्थाने स्वायत्तता निर्माण करण्याच्या प्रयत्नावर भर दिला पाहिजे.

आंबा, कोकम, फणस, जांभळ या